महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर,**

**नागपूर विभाग, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, मंगळवारी बाजार, नागपूर-४४०००१**

दुरध्वनी क्रमांक :- ०७१२-२५६५१४३

E-mail: ronagpur@dtemaharashtra Website : www.rdtenagpur.org.in

क्र. तंशिस/विकाना/आस्था-४/२०२५/4702 दिनांक: 12 DEC 2025

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

विषय :- "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" बाबतची माहिती संकेतस्थळावर अपलोड करुन विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याबाबत. .

संदर्भ :- १. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.९४/समन्वय, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५
२. DESK१६ दिनांक ०३/११/२०२५ चे ई-मेल परिपत्रक

सर्व संस्था/कार्यालय प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, मा. संचालनालयाच्या उपरोक्त संदर्भ १ अन्वये मा. ॲड धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १६.०९.२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना संचालनालयाच्या संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये आपणांस देण्यात आल्या होत्या. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्याबाबतचे निर्देश संचालनालयाच्या पत्रान्वये देण्यात आले होते.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी Registration Form/ नोंदणी संदर्भातील "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" बाबतची माहिती https://yuvacareer.com/indian-constitution-awareness-quiz/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर संकेतस्थळावर दिनांक १० डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत नोंदणी करण्याबाबत विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यात यावे. तसेच "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" बाबतची Registration Form / नोंदणी बाबतची माहिती आपले महाविद्यालयाचे संकेतस्थळावर तात्काळ प्रसारित करण्यात यावी.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" बाबतची माहिती संकेतस्थळावर upload करुण तसेच सदर प्रश्नमंजुषेकरीता नोदंणी करण्याबाबत विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

सहपतत्र: वरीलप्रमाणे

(डॉ. मनोजकुमार. भा. डायगव्हाणे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,.
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

DTEM-D१६/११२/२०२५-DESK१६

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

विषय :- "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" च्या अनुषंगाने दिनांक १६/०९/२०२५ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.९४/समन्वय, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५

प्रस्तुत प्रकरणी संदर्भाधीन शासन पत्र व त्या पत्रासोबत जोडलेली सहपत्रे कृपया पहावीत. (प्रत सोबत जोडली आहे.) मा.ॲड धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली दि.१६/०९/२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृताचे कृपया अवलोकन करावे.

या प्रकरणी शासनाच्या पत्रात नमुद तसेच इतिवृत्तात नमुद केलेले सर्व मुद्दे लक्षात घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना देण्यात याव्यात. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा. जेणे करुन सदर कार्यपालन अहवाल शासनास सादर करणे संचालनालयास शक्य होईल.

Signed by
Sunil Sukhadeo Bhamare
Date: 20-11-2025 14:54:44

(डॉ.सुनिल भामरे)
सह संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय म. रा., मुंबई.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांक:- बैठक -२०२५/प्र.क्र. ९४/समन्वय दिनांक:- १७ नोव्हेंबर, २०२५.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, ( कला ), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय - "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" च्या अनुषंगाने दिनांक १६/९/२०२५ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत**

महोदय,

महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मुंबई यांचे क्रमांक मराअजाआ/सा.आ./प्र.क्र. ५४१-२०२५/३९२२, दिनांक २२/९/२०२५ चे पत्र व त्यासोबतचे युवा करियर, नागपूर यांचे पत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

२. महाराष्ट्रातील शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची भारतीय संविधानाच्या इतिहास व संरचनेची समज वाढविणे या उद्दीष्टांच्या अनुषंगाने "भारतीय संविधानाची जागृती करणे, संविधानाविषयी नागरीकांचे गैरसमज दुर करणे या करीता प्रशिक्षण देणे" याकरीता, युवा करियर, नागपूर यांनी युवकांमध्ये संविधानाविषयी जागृती निर्माण होण्याच्या दृष्टीने " भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५" कार्यक्रमाचे आयोजन करण्याची महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती व जमाती आयोग, मुंबई यांना विनंती केली असून, त्यानुसार राबवावयाच्या कार्यक्रमाचे उद्दीष्ट, कार्यक्षेत्र, रचना, बक्षिसे व मान्यता, नोंदणीप्रक्रीया याबाबतची रुपरेषा तयार करण्यात आली आहे.

३. "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" च्या आयोजनासंदर्भात उपाध्यक्ष (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचेकडे दिनांक १६/९/२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

१) संविधान अमृतमहोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा- २०२५ या राज्यव्यापी उपक्रमात जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी व्हावेत

यासाठी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व सचिव, शालेय शिक्षण विभाग , मंत्रालय यांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२) यानुसार राज्यातील सर्व शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था तसेच विद्यापीठांना या उपक्रमाची सविस्तर माहिती त्वरीत कळविणारे परिपत्रक जारी करावे., जेणे करुन संबंधित संस्था विद्यार्थ्यांना वेळेत मार्गदर्शन करुन त्यांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करु शकतील.

३) या परिपत्रकात प्रत्येक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांनी त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (Website) संविधान प्रश्नमंजुषा,२०२५ या आयोजनाची माहिती ठळकपणे प्रसिद्ध करण्याबाबत स्पष्ट सुचना द्याव्यात. जेणेकरुन विद्यार्थ्यांना स्पर्धेचे नियम, नोंदणी प्रक्रीया व महत्वाचे दिनांक याबाबत सहज माहिती मिळेल.

४) प्रत्येक जिल्हयात या उपक्रमाच्या समन्वयासाठी एक जिल्हा समन्वयक नेमण्यात यावा. तसेच नेमलेल्या समन्वयकांचे नावं, पदनाम व संपर्क क्रमांक यांची माहिती संकलित करुन ती त्वरीत राज्य अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती आयोगास सादर करावी.

५) परिपत्रकात, विद्यार्थ्यांना संविधान प्रश्नमंजुषा-२०२५ ची उद्दीष्टे, स्पर्धेतील सहभागाची पद्धत, नोंदणी प्रक्रीया, अंतिम दिनांक तसेच जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी यांची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी.

६) विभागांनी आपल्या सर्व संलग्न प्राधिकरणे, संस्था व प्रकल्प कार्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत जास्तीत जास्त सहभाग मिळवून देण्यासाठी आवाहन करावे.

७) या संपूर्ण जनजागृती उपक्रमाची प्रगती, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद , तसेच राबवविण्यात आलेलया उपाययोजना याबाबतची सविस्तर माहिती राज्य अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती आयोगास लेखी स्वरुपात सादर करावी.

८) विद्यार्थ्यांसाठी संविधानावर आधारीत अभ्यासक्रम तयार करावा व जिल्हा स्तरावरील तसेच राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी प्रश्नपत्रिका परस्पर समन्वय साधून तयार करावी. संविधानाशी संबंधित विषय तांत्रिक व कायदेशीर स्वरुपाचे असल्याने विद्यार्थी सहजतेने समजू शकतील अशा पद्धतीने मराठी, हिंदी व इंगजी या तिन्ही भाषांमध्ये प्रश्नपत्रिका व मार्गदर्शक साहित्य वेळेत तयार करुन, तयार केलेला अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका व त्यासंबधीची संपूर्ण कार्ययोजना याबाबतचा सविस्तर अहवाल आणि प्रगती व माहिती व त्याचे अनुपालन याची माहिती सर्व विभागांनी संयुक्तरित्या राज्य अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती आयोगास तात्काळ सादर करावी.

६. तरी, उपाध्यक्ष (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचेकडे दिनांक १६/९/२०२५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्त व युवा करीयर, नागपूर यांनी सादर केलेल्या भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ संदर्भात निर्देशिकातील सूचनांच्या अनुषंगाने

आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास तसेच शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपली,

सोबत : वरीलप्रमाणे.

(गौरी म्हस्के)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

उपसचिव (म.शि./ तांशि/ विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

भारतीय जनता

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, प्रेअरी विभाग,
अब्दुलगफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४४८१९/०२ E-mailaddr:sestcomm@yahoo.com

जा.क्र.मराअजाआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/4688 दिनांक: 10 /११/२०२५

प्रति,

१.मा.सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२.मा.सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
३.मा.सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
४.मा.सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
५.मा.सचिव,इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
६.मा.सचिव,अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
७.मा.सचिव,माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
८.मा.आयुक्त,आदिवासी विकास विभाग,राम गणेश गडकरी चौक,जुना आग्रा रोड,नाशिक-२२
९.मा.आयुक्त,समाज कल्याण आयुकतालय,म.रा.पुणे
१०.कुलगुरू,महाराष्ट्र विधी विद्यापीठ,नागपूर
११.मा.महासंचालक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे
१२.मा.संचालक,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे

(शिक्का: अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. 2352 दि. 11/11/25)

विषय : " भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा २०२५ " युवा करिअरद्वारे निर्देशिका

संदर्भ :- १.आयोगाचे पत्र क्र.मराअजाजआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/३९२२ दि.२२/०९/२०२५
२. आयोगाचे पत्र क्र.मराअजाजआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/४११७ दि.८/१०/२०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने अर्जदार श्री.मोनाल अ. थुल युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्था यांच्या "संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५"च्या विषयाबाबत दि.१६/०९/२०२५ रोजी आयोगाचे मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष (सचिव दर्जा),महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती आयोग, मुंबई यांचे समोर झालेल्या सुनावणीचे इतिवृत्त आपणाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते. परंतु त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राप्त न झाल्याने दि.१२/११/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोगाच्या कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीस इतिवृत्ताच्या अनुषंगाने अहवालासह व संपुर्ण माहितीसह उपस्थित रहावे. इतिवृताची प्रत सोबत जोडली आहे.

मा.ॲड.धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष (सचिव दर्जा),महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती आयोग, मुंबई यांच्या आदेशानुसार कळविण्यांत येत आहे.

(शिक्का: महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग, मुंबई)

(स्वाक्षरी)
(रमेश वळवी)
पोलीस निरीक्षक
महाराष्ट्र राज्य अनु.जाती आयोग,
वरळी,मुंबई

प्रत :- अर्जदार श्री.मोनाल अ. थुल युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर

(हस्तलिखित टिपा: उ.स. (विधि); अ.स. (समन्वय); आज प्राप्त 13.11.25; 12.11.25; 13.11.2025)

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, बेकरी विभाग,
अब्दुलगफारखान मार्ग,वरळी सी-फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय) ०२२-२४९४३८१२.


आयोगाचे मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १६/०९/२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे.

## (सामाजिक व आर्थिक विभाग) प्रकरण क्रमांक- ५४१/२०२५

विषय :भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा- २०२५ : युवा करिअरद्वारे निर्देशिका.

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. सुरज मुनेश्वर, कक्ष अधिकारी उपस्थित. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव उपस्थित. सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. निलेश तायडे उपस्थित. श्रीमती चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री. सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्थेचे श्री.मोनाल अ. थुल उपस्थित होते.

श्रीमती चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नमूद केले की, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार वर्ग -८ वी ते पदवीधर पर्यंतच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनुसार कार्यक्रमाबाबत जागरुकता निर्माण करावी लागेल. तसेच सर्व संबंधित विभागाच्या मार्फत शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळा, वसतीगृह व प्रशिक्षण संस्था व इतर संस्था यांचेपर्यंत तात्काळ प्रभावाने आयोजनाची माहितीबाबत विद्यार्थ्यांमध्ये पोहचणेबाबतची परिपत्रके काढणे आवश्यक आहे.

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री.सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक यांनी नमूद केले की, संविधान अमृत महोत्सवी जनजागृतीबाबत उपक्रमाकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तशी तरतूद उपलब्ध आहे. त्या निधीतून सदर उपक्रम राबविता येईल. तसेच सध्या २ महिने बाकी आहेत. सदर चा उपक्रम हा तात्काळ प्रभावाने महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच जर १५ दिवसांचा प्रशिक्षण अभ्यासक्रम, संकेतस्थळ व इतर संबंधित तयारी तात्काळ करणे आवश्यक आहे. जर प्रशिक्षणाबाबत अभ्यासक्रम ३ भाषेमध्ये उपलब्ध असेल तर तो ऑनलाईन संकेतस्थळाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. तसेच या अभ्यासक्रमामध्ये नागरिकांसंबंधित भाग-३ रा मुलभूत हक्क, भाग-४ राज्य निर्देशत्वाची माहिती, मुलभूत कर्तव्य याबाबतची माहिती, संविधानाबाबत व त्यातील कायद्यांची माहिती देणे गरजेचे आहे. याबाबत सविस्तर सहाय्यता करण्यास विभाग तत्पर राहिल.

सचिव, शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव यांनी नमूद केले की, सदर उपक्रमाबाबत संबंधित कार्यालयाकडून संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ पासून "घर घर संविधान" कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना सादर करण्यात आला होता. त्यानुसार दि. १२.१२.२०२४ नुसार शालेय शिक्षण व साक्षर विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार संविधान दिन साजरा करण्यासाठी सूचक उपक्रम देण्यात आले असून त्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या पत्रानुसार घर घर संविधान कार्यक्रम साजरा करणेबाबतचा निधी वितरीत केला आहे.

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. सुरज मुनेश्वर, कक्ष अधिकारी यांनी नमूद केले
सदर उपक्रमाबाबत आयोगामार्फत प्रस्ताव विभागास सादर केल्यास व आयोगाने त्याबाबतच्या दिलेल्या निर्देशानुसार प्रस्ताव
सचिव यांचेकडे निधीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल. सदर उपक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांना घेण्याकरिता निधीची तरतूद
ता येईल.

तसेच, या उपक्रमाची जिल्हास्तरीय अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सहाय्यक
युक्त व प्रकल्प अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. हे नोडल अधिकारी जिल्ह्याच्या पातळीवर
शैक्षणिक संस्थांमध्ये स्पर्धेची माहिती पोहोचविणे, विद्यार्थ्यांचा सहभाग निश्चित करणे, आयोजनाची देखरेख करणे आणि
थिक खर्चाचा हिशोब सादर करणे यास जबाबदार राहतील.

वरील सर्व बाबींची काटेकोर अंमलबजावणी करून संविधान प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम राज्यभर यशस्वीरीत्या
पाडण्यात यावा, असे निर्देशित करण्यात येत आहे.

संविधान अमृतमहोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा २०२५ या राज्यव्यापी क्रमात जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील यासाठी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व सचिव, शालेय क्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तात्काळ कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. यानुसार राज्यातील सर्व शाळा, कनिष्ठ व रिष्ठ महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था तसेच विद्यापीठांना या उपक्रमाची सविस्तर माहिती त्वरित कळविणारे परिपत्रक जारी करावे, जेणेकरून संबंधित संस्था विद्यार्थ्यांना वेळेत मार्गदर्शन करून त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करू शकतील. सदर परिपत्रकात प्रत्येक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांनी त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (website) संविधान प्रश्नमंजुषा २०२५ या आयोजनाची माहिती ठळकपणे प्रसिद्ध करण्याबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांना स्पर्धेचे नियम, नोंदणी प्रक्रिया व महत्त्वाचे दिनांक याबाबत सहज माहिती मिळेल. तसेच प्रत्येक जिल्ह्यात या उपक्रमाच्या समन्वयासाठी एक जिल्हा समन्वयक (District Coordinator) नेमण्यात यावा. नेमलेल्या समन्वयकांचे नाव, पदनाम व संपर्क क्रमांक यांची माहिती संकलित करून ती त्वरित राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास सादर करण्यात यावी.

संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग तसेच अल्पसंख्याक विकास विभाग यांनी त्यांच्या विविध योजनांद्वारे लाभ घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत या कार्यक्रमाची सविस्तर माहिती पोहोचविण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी. संबंधित विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी परिपत्रक जारी करून कार्यक्रमाची माहिती सर्व शैक्षणिक संस्था, निवासी शाळा, वसतिगृह, प्रशिक्षण केंद्रे इत्यादींना लेखी स्वरूपात कळविण्यात यावी.

सदर परिपत्रकात विद्यार्थ्यांना संविधान प्रश्नमंजुषा २०२५ ची उद्दिष्टे, स्पर्धेतील सहभागाची पद्धत, नोंदणी प्रक्रिया, अंतिम दिनांक तसेच जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी यांची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी. विभागांनी आपल्या सर्व संलग्न प्राधिकरणे, संस्था व प्रकल्प कार्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत जास्तीत जास्त सहभाग मिळवून देण्यासाठी आवाहन करावे. या संपूर्ण जनजागृती उपक्रमाची प्रगती, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, तसेच राबविण्यात आलेल्या उपाययोजना याबाबतची सविस्तर माहिती राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास लेखी स्वरूपात सादर करावी.

RUPE

विद्यार्थ्यांसाठी संविधानावर आधारित अभ्यासक्रम तयार करावा व जिल्हास्तरावरील तसेच राज्यस्तरावरील ाठी प्रश्नपत्रिका परस्पर समन्वय साधून तयार करावी. संविधानाशी संबंधित विषय तांत्रिक व कायदेशीर स्वरूपाचे याने विद्यार्थी सहजतेने समजू शकतील अशा पद्धतीने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये प्रश्नपत्रिका व शेक साहित्य वेळेत तयार केलेला अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका व त्यासंबंधीची संपूर्ण कार्ययोजना याबाबतचा सविस्तर अहवाल प्रगती व माहिती त्याचे अनुपालन संबंधित सर्व विभागांनी संयुक्तरित्या राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती गास तात्काळ प्रभावाने सादर करण्यात यावी.

(ॲड. धर्मपाल मेश्राम)
उपाध्यक्ष तथा सदस्य

युवा करीयर

प्रति,

मा. उपाध्यक्ष तथा सदस्य,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग,
म. रा., मुंबई

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग, वरळी, मुंबई ४०० ०१८
आवक क्र 4856 दिनांक : 26.8.25
कार्यालय अधीक्षक

विषय :- भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 : युवा करिअर द्वारे निर्देशिका.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस विनंती अर्ज सादर करतो की, बोधी वृक्ष शिक्षण संस्था, नागपूर व्दारा संचालित युवा करियर क्लबव्दारा युवकांचा भविष्याच्या दृष्टीकोनातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असतात. आम्ही समाजातील युवकांमध्ये संविधाना विषयी जनजागृती करण्यासाठी भारतीय संविधान जागृती मंजुषा-२०२५ हा कार्यक्रम राबविणार आहोत. ज्याव्दारे युवकांमध्ये संविधाना विषयी जागृती निर्माण होईल. आम्ही राबविणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा खालीलप्रमाणे असणार आहे.

1. परिचय :

भारतीय संविधान, जे 26 जानेवारी 1950 रोजी स्वीकारले गेले, हे जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे अधिष्ठान आहे. ज्यामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे मूल्य अंतर्भूत आहेत. युवा करिअरने भारतीय संविधान क्विझ स्पर्धा 2025 ची सुरुवात केली आहे, ज्यामुळे युवकांमध्ये संविधानाचे महत्त्व समजावे आणि नागरिक ज्ञानास प्रोत्साहन मिळावे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानाच्या तत्त्वांविषयी सखोल आदर निर्माण करणे, त्यांना स्वस्थ स्पर्धेत सहभागी करून घेणे आणि त्यांच्या अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्यांविषयी जागरूकता वाढवणे हा आहे.

2. उद्दिष्टे :

युवा करिअर तर्फे आयोजित भारतीय संविधान क्विझचे उद्दिष्ट :
विद्यार्थ्यांची भारतीय संविधानाच्या इतिहास व संरचनेची समज वाढवणे. नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये तसेच भारतीय लोकशाहीची कार्यपद्धती याविषयी जागरूकता निर्माण करणे. विद्यार्थ्यांना भारताच्या घटनात्मक इतिहासाची व प्रमुख नेत्यांच्या योगदानाची कदर करण्यास प्रेरित करणे. विद्यार्थ्यांना राज्य पातळीवर असे व्यासपीठ उपलब्ध करून देणे जिथे ते आपले नागरिक ज्ञान व शासनाची समज प्रदर्शित करू शकतील.

3. प्रमुख फोकस क्षेत्रे :

प्रस्तावना : न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांसारख्या मूल्यांची जाण. मूलभूत अधिकार व कर्तव्ये : संविधानात नमूद केलेल्या अधिकारां व कर्तव्यांचा सखोल अभ्यास. धोरण मार्गदर्शक तत्त्वे : शासनात यांची भूमिका व महत्त्व. शासन रचना : कार्यकारी, विधायिका आणि न्यायपालिका यांची भूमिका व कार्ये. मुख्य दुरुस्ती व ऐतिहासिक खटले : सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्णय आणि संविधानातील प्रमुख दुरुस्ती. संविधान निर्माता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि इतर प्रमुख व्यक्तींचे योगदान.

4. भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 रचना :

नोंदणी : महाराष्ट्रातील शाळा व महाविद्यालये आपले विद्यार्थी युवा करिअरच्या ऑनलाइन व्यासपीठाद्वारे नोंदवू शकतात. प्रारंभिक फेरी : संविधान, शासन व नागरिक कर्तव्यांविषयी विद्यार्थ्यांचे ज्ञान तपासणारी ऑनलाइन परीक्षा. जिल्हा व राज्य स्तर : प्रारंभिक फेरीतील निवड विद्यार्थी पुढील स्तरावर सहभागी होतील. राज्यस्तर : राज्यस्तरीय विजेते राज्य स्तरावर स्पर्धा करतील.

Phone. 9422038808
Email. yuvacareerclub2015@gmail.com
Address. Shatabdi Sq. Manewada Ring Rode, Nagpur.

DATE:

5. भाषा व सुलभता :
स्पर्धेत व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी, भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये आयोजित केली जाईल. यामुळे विविध भाषिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना समान संधी मिळेल.

6. बक्षिसे व मान्यता :
**सर्वोत्तम शाळा** : राज्य स्तरावर तीन शाळांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिके. व्यक्तिगत पुरस्कार : उत्कृष्ट विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, प्रमाणपत्रे व विशेष मान्यता. सहभाग प्रमाणपत्र : सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील.

7. आयोजन संस्था :
युवा करिअर, जी संस्था युवक विकास व करिअर मार्गदर्शन यावर लक्ष केंद्रित करते, ती संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यास व विद्यार्थ्यांमध्ये नागरिक जबाबदारी प्रोत्साहित करण्यास कटिबद्ध आहे.

नोंदणी प्रक्रिया :
1. **आंतरिक निवड** : शाळा व महाविद्यालये स्वतःची पहिली निवड फेरी आयोजित करतील. निवडलेले विद्यार्थी प्रारंभिक फेरीसाठी नोंदणी करतील.
2. पात्रता : प्रारंभिक फेरीसाठी नोंदणी सर्व शाळा व महाविद्यालयांना खुली आहे.
3. नोंदणी अट : शाळा व महाविद्यालयांना किमान 10 विद्यार्थ्यांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करता येईल.
4. **नोंदणी शुल्क** : प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ₹99 शुल्क लागू होईल. नोंदणीवेळी शाळा / महाविद्यालय हे शुल्क भरतील.
5. नोंदणी लिंक : शाळा व महाविद्यालये [युवा करिअर क्लब] www.yuvacareer.com या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करू शकतात. नोंदणी व शुल्क भरण्याची प्रक्रिया "भारतीय संविधान क्विझ स्पर्धा" पृष्ठावर उपलब्ध असेल.

तरी वरील कार्यक्रम राबविण्यास आपणांस विनंती करतो, की संबंधीतास त्याबाबत आदेश निर्गमीत करण्यात यावे, ही विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासू,

(मोनाल थुल),

Phone.
Email. yuvacareerclub2015@gmail.com
Address. Shatabdi Sq. Manewada Ring Rode, Nagpur.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, डेअरी विभाग,
अब्दुलगफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४३८१९/०२
*E-mailadd:-scstcomm@yahoo.com*


जा.क्र.मराअजाजआ/मुं/सामाजिक व आर्थिक विभाग/प्र.क्र. ५४१-२०२५/ 5118 दि: 10 /१२/२०२५

प्रति,

१) मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. सचिव, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
७) मा. सचिव, अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) मा. कुलगुरू, महाराष्ट्र विधी विद्यापीठ, नागपूर.
९) मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक.
१०) मा. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) मा. आयुक्त, अल्पसंख्यांक विभाग, मुंबई
१२) मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग (सर्व)
१३) मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) मा. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संसथा (TRTI), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे - ४११००१.
१६) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, मुंबई -४००००१.
१७) मा. संचालक, कला संचालनालय विभाग, जुने सचिवालय, विस्तार भवन, महात्मा गांधी रोड, मुंबई - ४०० ०३२.
१८) मा. संचालक, इतर मागास बहुजनकल्याण विभाग, पुणे
१९) मा. सह संचालक, उच्च शिक्षण विभाग (सर्व)
२०) मा. सह संचालक, तंत्र शिक्षण विभाग (सर्व)
२१) मा. सह संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक (सर्व)
२२) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग (सर्व )
२३) मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजनकल्याण विभाग (सर्व)
२४) मा.जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
२५) मा. नियोजन अधिकारी (सर्व)
२६) मा. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)

**विषय : संविधान जागृती प्रश्न मंजुषा - २०२५.**

**संदर्भ : १) आयोगाचे पत्र क्र. मराअजाआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/३९२२, दि. २२.०९.२०२५**
**२) आयोगाचे पत्र क्र. मराअजाआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/४८०७, दि. १८.११.२०२५**

*(कृ.मा.प.)*

**मा. महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आयोगाचे मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, वरळी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली अनुक्रमे दि. १६.०९.२०२५ व दि. १२.११.२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भिय पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

उपरोक्त विषयाबाबत सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली **दि. १२.१२.२०२५ रोजी दुपारी २.०० वा. संविधान जागृती प्रश्न मंजूषा-२०२५ या विषयाबाबत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नागपूर येथील सभा कक्ष क्र. १०४ मध्ये बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व संबंधित अधिकारी यांनी बैठकीस उपस्थित रहावे किंवा दिलेल्या ऑनलाईन लिंकद्वारा बैठकीस उपस्थित रहावे, ही विनंती.**

मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, वरळी, मुंबई यांच्या निर्देशानुसार कळविण्यात येत आहे.

**सदर बैठकीची Link :** https://meet.google.com/pyt-ayzj-teq

(रमेश वळवी)
पोलीस निरीक्षक,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग,
वरळी, मुंबई.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुलगफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४३८१९/०२ E-mailadd:-sestcomm@yahoo.com

जा.क्र.मराअजाआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/ ३९२२ दिनांक:22/०९/२०२५

प्रति,

१.मा.सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२.मा.सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
३.मा.सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
४.मा.सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
५.मा.सचिव,इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
६.मा.सचिव,अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
७.मा.सचिव,माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
८.मा.आयुक्त,आदिवासी विकास विभाग,राम गणेश गडकरी चौक,जुना आग्रा रोड,नाशिक-२२
९.मा.आयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय,म.रा.पुणे
१०.कुलगुरू,महाराष्ट्र विधी विद्यापीठ,नागपूर
११.मा.महासंचालक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे
१२.मा.संचालक,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे

<u>विषय :</u> " भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा २०२५ "च्या अनुषंगाने दि.१६/०९/२०२५ रोजी आयोजित केलेल्या इतिवृत्त.

महोदय,

अर्जदार श्री.मोनाल अ. थुल युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्था यांच्या उपरोक्त विषयाबाबत "संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५" च्या अनुषंगाने दि.१६/०९/२०२५ रोजी मा.ॲड.धर्मपाल मेश्राम,उपाध्यक्ष (सचिव दर्जा),महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. इतिवृत्तात दिलेल्या निर्देशानुसार अनुपालन अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा ही विनंती.

मा.ॲड.धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष (सचिव दर्जा),महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती आयोग, मुंबई यांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग मुंबई

(मिनाक्षी आडे)
वरिष्ठ संशोधन अधिकारी
महाराष्ट्र राज्य अनु.जाती आयोग,
वरळी,मुंबई

प्रत :- अर्जदार श्री.मोनाल अ. थुल युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुलगफारखान मार्ग,वरळी सी-फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय) ०२२-२४९४३८१९,

आयोगाचे मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १६/०९/२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे.

## (सामाजिक व आर्थिक विभाग) प्रकरण क्रमांक- ५४१/२०२५

विषय :भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा- २०२५ : युवा करिअरद्वारे निर्देशिका.

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. सुरज मुनेश्वर, कक्ष अधिकारी उपस्थित. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव उपस्थित. सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. निलेश तायडे उपस्थित. श्रीमती चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री. सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्थेचे श्री.मोनाल अ. थुल उपस्थित होते.

श्रीमती चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नमूद केले की, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार वर्ग -८ वी ते पदवीधर पर्यंतच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनुसार कार्यक्रमाबाबत जागरुकता निर्माण करावी लागेल. तसेच सर्व संबंधित विभागाच्या मार्फत शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळा, वसतीगृह व प्रशिक्षण संस्था व इतर संस्था यांचेपर्यंत तात्काळ प्रभावाने आयोजनाची माहितीबाबत विद्यार्थ्यांमध्ये पोहचणेबाबतची परिपत्रके काढणे आवश्यक आहे.

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री.सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक यांनी नमूद केले की, संविधान अमृत महोत्सवी जनजागृतीबाबत उपक्रमाकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तशी तरतूद उपलब्ध आहे. त्या निधीतून सदर उपक्रम राबविता येईल. तसेच सध्या २ महिने बाकी आहेत. सदरचा उपक्रम हा तात्काळ प्रभावाने महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच जर १५ दिवसांचा प्रशिक्षण अभ्यासक्रम, संकेतस्थळ व इतर संबंधित तयारी तात्काळ करणे आवश्यक आहे. जर प्रशिक्षणाबाबत अभ्यासक्रम ३ भाषेमध्ये उपलब्ध असेल तर तो ऑनलाईन संकेतस्थळाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. तसेच या अभ्यासक्रमामध्ये नागरिकांसंबंधित भाग-३ रा मुलभूत हक्क, भाग-४ राज्य निर्देशत्वाची माहिती, मुलभूत कर्तव्य याबाबतची माहिती, संविधानाबाबत व त्यातील कायद्यांची माहिती देणे गरजेचे आहे. याबाबत सविस्तर सहाय्यता करण्यास विभाग तत्पर राहिल.

सचिव, शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव यांनी नमूद केले की, सदर उपक्रमाबाबत संबंधित कार्यालयाकडून संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ पासून "घर घर संविधान" कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना सादर करण्यात आला होता. त्यानुसार दि. १२.१२.२०२४ नुसार शालेय शिक्षण व साक्षर विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार संविधान दिन साजरा करण्यासाठी सूचक उपक्रम देण्यात आले असून त्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या पत्रानुसार घर घर संविधान कार्यक्रम साजरा करणेबाबतचा निधी वितरीत केला आहे.

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. सुरज मुनेश्वर, कक्ष अधिकारी यांनी नमूद केले की, सदर उपक्रमाबाबत आयोगामार्फत प्रस्ताव विभागास सादर केल्यास व आयोगाने त्याबाबतच्या दिलेल्या निर्देशानुसार प्रस्ताव मा. सचिव यांचेकडे निधीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल. सदर उपक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांना घेण्याकरिता निधीची तरतूद करता येईल.

तसेच, या उपक्रमाची जिल्हास्तरीय अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सहाय्यक आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. हे नोडल अधिकारी जिल्ह्याच्या पातळीवर सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये स्पर्धेची माहिती पोहोचविणे, विद्यार्थ्यांचा सहभाग निश्चित करणे, आयोजनाची देखरेख करणे आणि आर्थिक खर्चाचा हिशोब सादर करणे यास जबाबदार राहतील.

वरील सर्व बाबींची काटेकोर अंमलबजावणी करून संविधान प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम राज्यभर यशस्वीरीत्या पार पाडण्यात यावा, असे निर्देशित करण्यात येत आहे.

संविधान अमृतमहोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा २०२५ या राज्यव्यापी उपक्रमात जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील यासाठी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तात्काळ कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. यानुसार राज्यातील सर्व शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था तसेच विद्यापीठांना या उपक्रमाची सविस्तर माहिती त्वरित कळविणारे परिपत्रक जारी करावे, जेणेकरून संबंधित संस्था विद्यार्थ्यांना वेळेत मार्गदर्शन करून त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करू शकतील. सदर परिपत्रकात प्रत्येक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांनी त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (website) संविधान प्रश्नमंजुषा २०२५ या आयोजनाची माहिती ठळकपणे प्रसिद्ध करण्याबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांना स्पर्धेचे नियम, नोंदणी प्रक्रिया व महत्त्वाचे दिनांक याबाबत सहज माहिती मिळेल. तसेच प्रत्येक जिल्ह्यात या उपक्रमाच्या समन्वयासाठी एक जिल्हा समन्वयक (District Coordinator) नेमण्यात यावा. नेमलेल्या समन्वयकांचे नाव, पदनाम व संपर्क क्रमांक यांची माहिती संकलित करून ती त्वरित राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास सादर करण्यात यावी.

संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग तसेच अल्पसंख्याक विकास विभाग यांनी त्यांच्या विविध योजनांद्वारे लाभ घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत या कार्यक्रमाची सविस्तर माहिती पोहोचविण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी. संबंधित विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी परिपत्रक जारी करून कार्यक्रमाची माहिती सर्व शैक्षणिक संस्था, निवासी शाळा, वसतिगृह, प्रशिक्षण केंद्रे इत्यादींना लेखी स्वरूपात कळविण्यात यावी.

सदर परिपत्रकात विद्यार्थ्यांना संविधान प्रश्नमंजुषा २०२५ ची उद्दिष्टे, स्पर्धेतील सहभागाची पद्धत, नोंदणी प्रक्रिया, अंतिम दिनांक तसेच जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी यांची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी. विभागांनी आपल्या सर्व संलग्न प्राधिकरणे, संस्था व प्रकल्प कार्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत जास्तीत जास्त सहभाग मिळवून देण्यासाठी आवाहन करावे. या संपूर्ण जनजागृती उपक्रमाची प्रगती, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, तसेच राबविण्यात आलेल्या उपाययोजना याबाबतची सविस्तर माहिती राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास लेखी स्वरूपात सादर करावी.

विद्यार्थ्यांसाठी संविधानावर आधारित अभ्यासक्रम तयार करावा व जिल्हास्तरावरील तसेच राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी प्रश्नपत्रिका परस्पर समन्वय साधून तयार करावी. संविधानाशी संबंधित विषय तांत्रिक व कायदेशीर स्वरूपाचे असल्याने विद्यार्थी सहजतेने समजू शकतील अशा पद्धतीने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये प्रश्नपत्रिका व मार्गदर्शक साहित्य वेळेत तयार केलेला अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका व त्यासंबंधीची संपूर्ण कार्ययोजना याबाबतचा सविस्तर अहवाल आणि प्रगती व माहिती त्याचे अनुपालन संबंधित सर्व विभागांनी संयुक्तरित्या राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास तात्काळ प्रभावाने सादर करण्यात यावी.

(ॲड. धर्मपाल मेश्राम)
उपाध्यक्ष तथा सदस्य

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुलगफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४३८१९/०२
*E-mailadd:-scstcomm@yahoo.com*

जा.क्र.मराअजाआ/मुं/सामाजिक व आर्थिक विभाग/प्र.क्र.५४१-२०२५/ ४८०७ दि:१८/११/२०२५

प्रति,

१) मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. सचिव, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
७) मा. सचिव, अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) मा. कुलगुरू, महाराष्ट्र विधी विद्यापीठ, नागपूर.
९) मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक.
१०) मा. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) मा. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संसथा (TRTI), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय : संविधान जागृती प्रश्न मंजुषा - २०२५.**

अर्जदार श्री. मोनाल अ. थुल यांच्या वरील विषयाच्या अनुषंगाने आयोगाचे मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, वरळी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२.११.२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशानुसार अहवाल आयोगास सादर करावा, ही विनंती.

मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग, वरळी, मुंबई यांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

( रमेश वळवी )
पोलीस निरीक्षक,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग,
वरळी, मुंबई.

प्रत : श्री. मोनाल अ. थुल, युवा करिअर, बोधीवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर.

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई - ४०० ०१८
दूरध्वनी क्रं. (कार्यालय) ०२२-२४९४३८१९,


**महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १२/११/२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे.**

**(सामाजिक व आर्थिक विभाग) प्रकरण क्रमांक - ५४१/२०२५**

**विषय :- संविधान जागृती प्रश्न मंजुषा - २०२५**

दि. १२/११/२०२५ रोजी आयोजित बैठकीमध्ये सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई व आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे वतीने श्रीमती स्वाती इथापे, उपायुक्त (ना.ह.सं), समाज कल्याण, पुणे, सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई याचे वतीने श्री. प्र. दा. अंधारे, कक्ष अधिकारी, आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे वतीने श्री. अनिल महाजन, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव, सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. श्रीनाथ हेंद्रे, कक्ष अधिकारी. सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. पोवार, प्रतिनिधी, महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री. सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक उपस्थित होते. कुलगुरू, महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठ, नागपूर यांच्या वतीने प्राध्यापक (डॉ.) व्ही.पी. तिवारी, कायदा विभाग प्रमुख उपस्थित होते.

श्री. अनिल महाजन, सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी नमूद केले की, आयुक्तालयाचे पत्र क्रं. शिक्षण-२०२५/प्र.क्र./का-६(४) ७७९२, दि. ८/१०/२०२५ अन्वये संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ राबविण्या संबंधी आयुक्तालयाने प्रकल्प अधिकारी व मुख्याध्यापक यांना निर्देश दिलेले आहेत. त्यामध्ये संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ राबविण्यासाठी येणारा खर्च कार्यालयाला प्राप्त होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावे. प्रत्येक शाळेतून किमान १० विद्यार्थी पेक्षा अधीक विद्यार्थी भाग घेतील अशा पध्दतीने नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आलेले आहेत, असे सांगितले.

यावर आयोगाने नमूद केले की, आयुक्त, आदिवासी विकास विभाग, म. रा., नाशिक यांनी या विषयाच्या संदर्भाने सकारात्मक प्रतिसाद देत त्यांनी त्या पध्दतीचे आदेश काढलेले असून कार्यवाही सुरू केलली आहे. संकेतस्थळ प्राप्त होताच त्यांना सगळ्या अनुदानित व शासकीय आश्रमशाळामधील निवडक विद्यार्थ्यांना संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ या महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या पुढाकारातून सुरू केलेल्या उपक्रमातून विभागाने मान्यता दिलेली आहे व तशा पध्दतीची कार्यवाही सुरू केलेली आहे. तसेच इतर खर्चातून आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी सर्व अनुदानित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी प्राप्त तरतूदीतून या खर्चाची व्यवस्था करुन देण्यात आली आहे, प्रत्येक शाळेतून किमान १० किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी भाग घेतील, अशा पध्दतीची विभागाची तयारी झालेली आहे. याच प्रकारे सर्व विभागाने देखील कार्यवाही करावी असे आयोगाने निर्देश दिले.


...२..
कृ.मा.प.

श्रीमती स्वाती इथापे, उपायुक्त (ना.ह.सं), समाज कल्याण विभाग, म. रा., पुणे यांनी नमूद केले की, शासकीय निवासी शाळा-९२, शासकीय वसतिगृहे-४४९ आहेत. त्यातील इच्छूक विद्यार्थ्यांची निवड करणे व त्यांना संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ या उपक्रमामध्ये त्यांचा सहभाग नोंदविणे यासाठी आपल्या स्तरावर विभाग कार्यवाही करत आहे. याबाबतच्या खर्चाची तरतूद सामाजिक न्याय विभागाने या सर्व शाळांच्या व वसतिगृह मुख्याध्यापकांना व वसतिगृह प्रमुखांना तात्कालीक कार्यासाठी ज्या राशीची तरतूद करण्यात आलेली आहे, त्या राशीतून या उपक्रमासाठीचा खर्च करण्यात येईल. तशा पध्दतीने कार्यवाही करुन याबाबत माहिती देणेबाबत मुख्याध्यापकांना वसतिगृह प्रमुखांना सूचना दिल्या आहेत.

श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव यांनी नमूद केले की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने याबाबत दि. २५.०२.२०२४ ला पत्र काढले आहे. तसेच भारत सरकारचे शालेय शिक्षा व साक्षरता विभाग यांचे दि. ०३.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये दि. २६.११.२०२४ ते २६.११.२०२५ या एक वर्षाच्या कालावधीमध्ये संविधान दिवस साजरा करण्याबाबतच्या उपक्रमांचे वेळापत्रक दिले आहे. तसेच संबंधितांकडून अभिप्राय / कंसेंट घ्यावयाचे आहेत. शालेश शिक्षण विभागाकडे महाराष्ट्र राज्यामधील शासकीय शाळा ६५,०६४ असून एकूण ५१,६७,१२७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. साधारणता अनुदानित, शासकीय व विनाअनुदानित शाळा १,०८,००० असून त्यामध्ये शिक्षण घेण्यान्या विद्यार्थ्यांची संख्या २,१२,००,००० आहे. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी भारतीय संविधान - २०२५ हा उपक्रम राबविण्यासंबंधी निर्देशित केल्याप्रमाणे हा कार्यक्रम सशुल्क असल्याने आम्हाला नियमानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील गाभा समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्या विभागाची नियमानुसार परवानगी घेणे आवश्यक आहे.

त्यावर आयोगाने निर्देशित केले की, शालेय शिक्षण विभागाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील गाभा समितीच्या आवश्यक त्या अभिप्राय / परवानग्या प्राप्त करुन या कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग नोंदविण्याची कार्यवाही तत्काळ प्रभावाने करुन पुढील कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसामध्ये आयोगास माहित्ती द्यावी, असे निर्देशित केले.

श्री. श्रीनाथ हेंद्रे, कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी नमूद केले आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत ९८० निवासी आश्रमशाळा आहेत. त्यामध्ये साधारणतः सव्वा दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विभागांतर्गत आश्रमशाळांमध्ये संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ हा उपक्रम राबविणेबाबत या विभागाच्या दि. ११.११.२०२५ रोजीच्या परिपत्रक निर्गमित केले आहे. तसेच प्रत्येक शाळेला वेतनेत्तर अनुदान देण्यात येत असून त्यातून हा खर्च भागवावा, असे निर्देश संबंधित शाळांना दिलेले आहेत.

श्री. प्रशांत अंधारे, कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी नमूद केले की, अल्पसंख्यांक विकास विभागाकडून विविध कल्याणकारी योजना येतात त्याप्रमाणे सदरचा उपक्रम राबविण्यात राबविणेबाबत विभागामार्फत सूचना देत आहोत. तसेच सदर आयोगाच्या बैठकीचे पत्र दि. ११.११.२०२५ रोजी मिळाले आहेत. तसेच या उपक्रमाबाबत रुपरेषा तयार करुन या उपक्रमात वसतीगृह व इतर योजनांच्या लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्याबाबत सूचना केली जाईल.

...३..

कृ.मा.प.

त्यावर आयोगाने असे निर्देशित केले की, अल्पसंख्याक विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या वसतीगृह, शाळा मधील विद्यार्थ्यांची संख्या व विविध योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या याची माहिती आयोगास सादर करावी. तसेच अल्पसंख्याक विभागाने तीन कार्यालयनी कामकाजाच्या दिवसामध्ये त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यरत संस्था, शाळा व विविध उपक्रमांच्या माध्यमांतून लाभार्थ्यांची संख्या याची माहिती आयोगास उपलब्ध करुन द्यावी. तसेच संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ या उपक्रमाच्या निमित्ताने काय कार्यवाही केली. याबाबतचे सर्वकष पत्र आयोगास सादर करावे, असे निर्देशित करण्यात येत आहे.

सदर बैठकीस महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठ, नागपूर यांच्या वतीने प्राध्यापक (डॉ.) व्ही. पी. तिवारी, कायदा विभाग प्रमुख, डॉ. दिविता कोठेकर, सहाय्यक प्राध्यापक आणि डॉ. आरती तायडे, सहाय्यक प्राध्यापक उपस्थित होते. संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या पाठ्यक्रमाची सविस्तर माहिती बैठकीत देण्यात आली. मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषांमध्ये १५ दिवसांचे ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित केले जाणार असल्याचे सांगण्यात आले. प्रश्न मंजुषेसाठीचे प्रश्नसंच हा तयार केलेल्या पाठ्यक्रमावर आणि प्रशिक्षणा दरम्यान शिकवलेल्या विषयांवर आधारीत असेल, असेही स्पष्ट करण्यात आले. तसेच या उपक्रमात सहभाग आणि सहकार्य करण्याबाबत सूचित करण्यात आले.

कुलगुरु, कुलसचिव, महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठ, नागपूर यांनी सदर विषयातील तज्ञ प्राध्यापकासह बैठकीला उपस्थित विविध विभागातील सर्व जेष्ठ अधिकाऱ्यांच्या समन्वयाने व विविध विभागाचा अभिप्राय घेऊन पाठ्यक्रम व प्रश्नावली तयार करावी. त्याकरिता बार्टी, पुणे यांनी दुरदृष्य प्रणालीव्दारे बैठकीचे आयोजन करावे. बैठक आयोजित करण्यासाठी वरील संस्थेची मदत घ्यावी. त्यासंबंधी माहिती आयोगाकडे सादर करावी.

संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ हा उपक्रम दि. २६ नोव्हेंबर, २०२५ ते दि. २६ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागाने वेगवेगळया पध्दतीने कालबध्द कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांना संविधानाची माहिती व संपूर्ण ज्ञान प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी, असे निर्देशित करण्यात आले.

सदर उपक्रमाच्या उद्घाटनासाठी मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. ना. श्री. अजीतदादा पवार, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. संजय शिरसाट, मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य व श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांना महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या वतीने निमंत्रण देऊन त्यांची वेळ आरक्षीत करण्याची कार्यवाही आयोगाचे सदस्य सचिव यांनी करावी, असे निर्देशित करण्यात आले. संबंधीत सर्व विभागाने या संपूर्ण उपक्रमाची कालबध्द पध्दतीने अंमलबजावणी करीत त्याचा अनुपालन अहवाल वेळोवेळी आयोगाकडे सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आले.

(ॲड. धर्मपाल मेश्राम)
उपाध्यक्ष तथा सदस्य,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग,
म. रा., मुंबई